क्र. विविआ/म.रा./पुनर्रचना कक्ष/प्र.क्र.६०/ब- ५१२८

विशेष विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय,
३ रा मजला, विक्रीकर भवन,
माझगाव, मुंबई - ४०० ०१०.
दिनांक : ०८-१२-२०१४

## कार्यालयीन आदेश

**विषय - विक्रीकर सहआयुक्त (अपिले) व विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांच्याकडील अपिल प्रकरणे निपटाऱ्यासाठी स्थानांतरीत करण्याबाबत.**

संदर्भ - १) कार्यालयीन आदेश क्र. अपिले/एकत्रिकरण/पुन.कक्ष/प्र.क्र.६०/ब-३७९ दि. ०१/१२/२०११.
२) कार्यालयीन आदेश क्र. विविआ/म.रा./पुन.कक्ष/प्र.क्र.६०/अपिले कार्यभार/ब-४३० दि. ०३/०५/२०१२.
३) कार्यालयीन आदेश क्र. विविआ/पुन.कक्ष/प्र.क्र.६०/अपिले कार्यभार/ब-१३ दि. १३/०१/२०१४.
४) कार्यालयीन आदेश क्र. विविआ/म.रा./पुन.कक्ष/प्र.क्र.६०/विउआ/अपिले कार्यभार/ब-१३० दि. ०१/०४/२०१४.

संदर्भाधिन आदेशान्वये, विक्रीकर सहआयुक्त (अपिले) व विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांच्या कामाची वाटणी व कार्यक्षेत्र घोषित करण्यात आले आहे.

मुंबई क्षेत्रातील व मुंबई बाहेरील प्रलंबित अपिल प्रकरणांचा आढावा घेतला असता, मोठ्या प्रमाणात अपिल प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब विचारात घेता, अपिल प्रकरणे निपटाऱ्यासाठी इतर अधिकाऱ्यांकडे स्थानांतरीत करणे आवश्यक आहे. यास्तव खालील विक्रीकर सहआयुक्त (अपिले) व विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांचेकडील प्रलंबित अपिले, त्वरीत निपटाऱ्यासाठी या आदेशान्वये निम्नलिखित अधिकाऱ्यांकडे स्थानांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. संबंधित अपर विक्रीकर आयुक्त/विक्रीकर सहआयुक्त यांनी स्थानांतरीत करावयाच्या अपिल प्रकरणांचे स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करावेत.

| अ. क्र. | सध्याचे अपिल कार्यभार | ज्या अधिकाऱ्याकडे प्रलंबित अपिले स्थानांतरण करावयाची आहेत त्या अधिकाऱ्याचे पदनाम | महाविकास सांकेतांक | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | विक्रीकर सहआयुक्त (अपिल) २, मुंबई | विक्रीकर सहआयुक्त (मु.ले.प.) २, मुंबई | MUM-VAT-F-901 | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (२), तपासणी शाप कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) [उपरोक्त शाखेअंतर्गत विक्रीकर उपआयुक्त यांनी पारित केलेले आदेश] |



EST 2 LETTER

| अ. क्र. | सध्याचे अपिल कार्यभार | ज्या अधिकाऱ्याकडे प्रलंबित अपिले स्थानांतरण करावयाची आहेत त्या अधिकाऱ्याचे पदनाम | महाविकास सांकेतांक | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ३. | ४. | ५. |
| | | विक्रीकर सहआयुक्त (मु.ले.प) २, मुंबई | MUM-VAT-F-902 | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (२), तपासणी ज्ञाप कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) [उपरोक्त शाखेअंतर्गत विक्रीकर उपआयुक्त यांनी पारित केलेले आदेश] |
| २. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ३, मुंबई | विक्रीकर सहआयुक्त (प.ले.प) १, मुंबई | MUM-VAT-F-701 | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (३), विवरण व वसुली शाखा (१) व (२), जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) [उपरोक्त शाखेअंतर्गत विक्रीकर उपआयुक्त यांनी पारित केलेले आदेश] |
| | | विक्रीकर सहआयुक्त (प.ले.प) २, मुंबई | MUM-VAT-F-702 | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (३), विवरण व वसुली शाखा (१) व (२), जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) [उपरोक्त शाखेअंतर्गत विक्रीकर उपआयुक्त यांनी पारित केलेले आदेश] |
| ३. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ४, मुंबई | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ५, मुंबई | CST-APP-F-005 | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (४), मोठे करदाते कक्ष (४), नवीन अपिले मुंबई विक्रीकर कायदा विभाग, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) [उपरोक्त शाखेअंतर्गत विक्रीकर उपआयुक्त यांनी पारित केलेले आदेश] |
| ४. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) २, मुंबई | विक्रीकर उपआयुक्त (अं.ले.प.) ६, मुंबई | CST-AUI-E-006 | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (२), परतावा लेखा परीक्षण (२), सर्वेक्षण शाखा, तपासणी ज्ञाप कक्ष, नमुना-७०४ कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) [उपरोक्त शाखेअंतर्गत सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांनी पारित केलेले आदेश] |

| अ. क्र. | सध्याचे अपिल कार्यभार | ज्या अधिकाऱ्याकडे प्रलंबित अपिले स्थानांतरण करावयाची आहेत त्या अधिकाऱ्याचे पदनाम | महाविकास सांकेतांक | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| ५. | विक्रीकर उपआयुक्त (अपिल) ३, मुंबई | विक्रीकर उपआयुक्त (सर्वेक्षण) १, मुंबई | MUM-SUR-E-001 | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (३), वितरण व वसुली शाखा (१) व (२), जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) [उपरोक्त शाखेअंतर्गत सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांनी पारित केलेले आदेश] |
| ६. | विक्रीकर उपआयुक्त (अपिल) ४, मुंबई | विक्रीकर उपआयुक्त (अ.ले.प.) ५, मुंबई | CST-AUI-E-005 | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (४), व्यवसायकर शाखा व इतर कायदे, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) [उपरोक्त शाखेअंतर्गत सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांनी पारित केलेले आदेश] |
| ७. | विक्रीकर उपआयुक्त (अपिल) ६, मुंबई | विक्रीकर उपआयुक्त (सर्वेक्षण) २, मुंबई | MUM-SUR-E-002 | मुंबईतील मुद्रांकहाय लेखा परीक्षण शाखा (२), अन्वेषण शाखा (ब), नवीन अपिले मुंबई विक्रीकर कायदा विभाग, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) [उपरोक्त शाखेअंतर्गत सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांनी पारित केलेले आदेश] |

तसेच मुंबईबाहेरील खालील तक्त्यातील रकाना क्र. २ मधील कार्यभारातील व रकाना क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या कार्यक्षेत्रातील, अपिल प्रकरणे रकाना क्र. ३ मधील कार्यभारात स्थानांतरीत करण्यात यावीत. तर रकाना क्र. ३ मधील अधिकाऱ्यांचे यापुढील कालावधीचे कार्यक्षेत्र रकाना क्र. ५ प्रमाणे राहील.

| अ. क्र. | सध्याचे अपिल कार्यभार | ज्या अधिकाऱ्याकडे प्रलंबित अपिले स्थानांतरण करावयाची आहेत त्या अधिकाऱ्याचे पदनाम | महाविकास सांकेतांक | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| ८. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, ठाणे ग्रामिण विभाग पालघर | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट प्रशासन), नालासोपारा | NAL-VAT-E-001 | नालासोपारा |

| अ. क्र. | सध्याचे अपिल कार्यभार | ज्या अधिकाऱ्याकडे प्रलंबित अपिले स्थानांतरण करावयाची आहेत त्या अधिकाऱ्याचे पदनाम | महाविकास सांकेतांक | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| ९. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, ठाणे शहर | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट प्रशासन), कल्याण | KAL-VAT-E-001 | कल्याण |
| १०. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, रायगड | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट प्रशासन), अलिबाग | ALI-VAT-E-001 | अलिबाग |
| ११. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) १, पुणे | विक्रीकर उपआयुक्त (नोंदणी), पुणे | PUN-VAT-E-101 | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फक्त नोंदणी शाखेतील (जुनी व व्हॅटमधील) अपिले |
| १२. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) २, पुणे | विक्रीकर उपआयुक्त (समुपदेशन कक्ष), पुणे | PUN-VAT-E-102 | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्र वगळून पुणे विभागातील फक्त नोंदणी शाखेतील (जुनी व व्हॅटमधील) अपिले |
| १३. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, धुळे | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट प्रशासन), जळगांव | JAL-VAT-E-001 | जळगांव |
| १४. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, नाशिक | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट प्रशासन), अहमदनगर | AHM-VAT-E-001 | अहमदनगर |
| १५. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, औरंगाबाद | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) ७, औरंगाबाद | AUR-VAT-E-007 | औरंगाबाद |
| | | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट प्रशासन), जालना | JAL-VAT-E-001 | जालना |

अनु. क्र. ८ ते १५ वरील रकाना क्र. २ मधील अधिकाऱ्यांनी रकाना क्र. ३ मधील अधिकाऱ्यांकडे संबंधित कार्यक्षेत्रातील प्रलंबित सर्व अपिल प्रकरणे वर्ग करावीत. रकाना क्र. ३ मधील अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील स्थानांतरीत होणारी व यापुढे नव्याने दाखल होणारी अपिले सर्व कारणासाठी स्विकारावीत व त्यांचा नियमित निपटारा करावा. प्रलंबित प्रकरणे स्थानांतरणानंतर कोणत्या कार्यभारात हाताळली जाणार आहेत त्या कार्यभाराचा क्रमांक व कार्यालयीन जागेबाबत, संबंधित व्यापाऱ्यांना वेळीच कळवावे. वरील बदलाची नोंद घेऊन संबंधित निर्धारणा आदेश पारीत करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या आदेशात निर्देशित केलेल्या अपिल प्राधिकाऱ्याचा उल्लेख करण्याबाबत कळवावे.

संबंधित विक्रीकर सहआयुक्त (अपिले) व विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांनी प्रलंबित प्रकरणे स्थानांतरीत केल्याचे अहवाल अपर विक्रीकर आयुक्त (व्यवसायकर), मुंबई यांचेकडे सादर करावेत.

विक्रीकर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१) विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मुख्य दक्षता अधिकारी.
३) सर्व अपर विक्रीकर आयुक्त.
४) सर्व विक्रीकर सहआयुक्त.
५) विक्रीकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी.
६) संबंधित अधिकारी.
७) निवडनस्ती.
८) स्थळप्रत.